**नियमित फौजदारी खटला क्र. ५३९/२०१२ मधील नि. क्र. १६२, १७९, १८२, १८६, १८७, १८८, १८९, १९०, १९१, १९२, १९३, २६६ वरील संयुक्त आदेश.**

या खटल्यात २२ आरोपी असून त्यापैकी काही आरोपींनी त्यांना खटल्यातून वगळण्यात यावे (डिसचार्ज करण्यात यावे) म्हणून अर्ज दिलेले आहेत. कोणत्या आरोपीचा अर्ज कोणत्या निशाणीवर आहे, ते खालील तक्त्यात मी देत आहे.

| अ.क्र. | आरोपी क्र. | निशाणी क्र. |
|---|---|---|
| १. | १० | १६२ |
| २. | १२ | १७९ |
| ३. | २० | १८२ |
| ४. | ४ | १८६ |
| ५. | ६ | १८७ |
| ६. | ९ | १८८ |
| ७. | ११ | १८९ |
| ८. | १३ | १९० |
| ९. | १४ | १९१ |
| १०. | १५ | १९२ |
| ११. | ५ व ८ | १९३ |
| १२. | ७ | २६६ |

**२.** आरोपी क्र. २० वगळता इतर आरोपी अहमदनगर जिल्हा दुध संघाचे संचालक असून आरोपी क्र. २०, ५ व ८ यांचे अर्ज वगळता आरोपी क्र. ४, ६, ७, ९, १०, ११, १२, १३, १४, १५ या आरोपींच्या अर्जातील मजकूर एकसारखा असून तो खालीलप्रमाणे आहे.

**३.** आरोपी हे नगर तालुका सहकारी दुध व्यावसायीक व प्रक्रिया संघाचे संचालक होते. सदरच्या संघाची नोंदणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये झालेली आहे. संघाचा कारभार हा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०

व संघाचे पोटनियमानुसार चालतो. संघाचे संचालक मंडळाची निवड पाच वर्षाला लोकशाही पद्धतीने सभासदांमधून केली जाते, तसेच संघाच्या संचालक मंडळाची सभा या पोटनियमाप्रमाणे प्रत्येक महिन्यातून कमीत कमी एक होते व वार्षिक सर्वसाधारण सभा प्रत्येक वर्षाचे आर्थिक वर्ष संपल्यानंतर ६ महिन्याचे आत घेतली जाते. सहकार कायदयाप्रमाणे वार्षिक सर्वसाधारण सभेतील निर्णय हा अंतिम निर्णय असतो. कारण सभासद हे संस्थेचे मालक असतात व सभासदाने सभासदाचे हितासाठी चालविलेली संस्था म्हणजेच सहकारी संस्था हे सहकार कायदयाचे तत्व आहे, त्यामुळे सर्व सभासद हे संस्थेचे मालक आहेत व ते सर्व फक्त वार्षिक सर्व साधारण सभेत भाग घेतात. संचालक मंडळाने केलेल्या कामाचा आढावा घेतात.

**४.** सदरचा संघ ही सहकारी संस्था असल्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतुद कलम ८१ अन्वये लेखापरिक्षकाची नेमणूक त्याकाळी शासनाकडून केली जात होती. त्याप्रमाणे फिर्यादीची नेमणूक लेखा परिक्षक म्हणून शासनाने केली होती व त्यांना संघाचे सन २००५ ते २००७ या कालावधीमधील लेखापरिक्षणाचे काम करण्यास सांगितले होते. त्यांनी नियमबाहय व चुकीचे पद्धतीने लेखा परिक्षण केलेले आहे. संघाचा दैनंदिन कारभार पाहण्याची जबाबदारी ही पदाधिकारी यांची असते. त्यामध्ये चेअरमन, व्हाईस चेअरमन, कार्यकारी संचालक, जनरल मॅनेजर व इतर यांची असते. संचालक मंडळ फक्त प्रत्येक महिन्याचे सभेमध्ये धोरणात्मक निर्णय घेते. त्याची अंमलबजावणी करण्याचे काम पदाधिकारी यांची आहे. संचालक मंडळाचे सदस्याने सभेत उपस्थित राहून ठरावास मान्यता दिली असेल तर ते संचालक महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३(५) अन्वये मान्यता दिलेल्या ठरावातील व्यवहारास जबाबदार धरता येईल अशी स्पष्ट तरतुद कायदयात केली आहे, परंतू या बाबीचे फिर्यादीने हेतुपुरस्पर दुर्लक्ष करून सदरील प्रकरणी वरील आरोपी यांना देखील आरोपी म्हणून सामील केलेले आहे.

**५.** संघाचे शितकरण केंद्रावर दररोज संकलीत होणारे दुध हे शितकरण

करण्याची व स्विकारण्याची जबाबदारी ही कर्मचारी व पदाधिकारी यांची आहेत. त्याचा संचालक मंडळास कोणताही संबंध येत नाही, तसेच सदरचे फिर्यादीत नमुद केलेल्या दुध संघातील अपहाराबाबत संचालकांचा काहीही एक सहभाग येत नाही. दुध साठयाबाबतचा कोणताही विषय संचालक मंडळाचे सभेसमोर आलेला नव्हता व नाही. त्यामुळे त्यास मान्यता देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, तसेच वितरण केलेल्या दुधाची रक्कम वसूल करण्याचे काम पदाधिकारी यांचे आहे. रक्कम वसूल होत नसेल तर तशी माहिती संचालक मंडळास देण्याची जबाबदारी त्यांची असून तसा ठराव करून वसुलीची कार्यवाही करणे आवश्यक आहे, परंतू या प्रकरणात तसे काहीही घडलेले नाही. सदरचे फिर्यादीत नमुद केलेल्या तथाकथीत अपहार अगर गैरव्यवहारास अर्जदार /आरोपी हे जबाबदार नाहीत.

**६.** संघाचे प्रत्येक वर्षी आर्थिक वर्ष संपल्यानंतर लेखापरिक्षण केलेले आहे. त्याप्रमाणे श्री. के. डी. पाटील फिर्यादी यांनी सन २००५ ते २००७ या वर्षीचे लेखापरिक्षण केलेले आहे. लेखा परिक्षणात संस्थेचे व्यवहार / कारभार कसा झाला याबाबतचे लेखा परिक्षणाचे कामात लेखापरिक्षक त्यांचे मत नोंदवित असतो. सदरचे तथाकथित लेखा परिक्षण हे नोव्हेंबर सन २००७ मध्ये झालेले आहे. त्याबाबत त्याकाळात शासनाने संस्थेवर प्रशासकाची नेमणुक केलेली होती. संस्थेचे सर्व कारभार प्रशासक मंडळ पाहत होते. सदरचे लेखा परिक्षण करतांना वस्तुस्थितीचा विचार केलेला नाही. फिर्यादी यांनी लेखापरिक्षणानंतर अहवाल दिलेला आहे व सदरचे अहवालावरून फिर्याद दाखल केलेली आहे. फिर्यादी यांनी लेखापरिक्षणाचा रिपोर्ट देण्यापूर्वी अर्जदार यांना म्हणणे मांडण्याची संधी देणे आवश्यक होते, परंतू ती संधी दिली नाही. नैसर्गिक न्यायाचे तत्वाची पायमल्ली केलेली आहे.

**७.** फिर्यादी यांनी केलेल्या तथाकथित लेखापरिक्षणामध्ये पान क्र. १८ वर सदर गैरव्यवहार अधिकारी, कर्मचारी व पदाधिकारी जबाबदार आहेत, असे नमूद केलेले आहे. अर्जदार / आरोपी हे पदाधिकारी नाहीत व कार्मचारीही नाहीत, त्यामुळे त्यांची

त्यामध्ये काही एक जबाबदारी येत नाही, तसेच दुधाचे शितकरण व वितरण यास शितकरण केंद्रावरील कर्मचारी जबाबदारी आहेत, असे नमुद केले आहे. त्यास संचालक मंडळाची मान्यता घेतली नाही ही बाब संचालक मंडळाचे परस्पर केलेली आहे, असे नमुद केलेले आहे. तसेच फिर्यादीचे अवलोकन केले असता त्यामध्ये अर्जदार /आरोपी हे वैयक्तिकरित्या जबाबदार आहेत. अर्जदार / आरोपी यांनी अपहार, गैरव्यवहार केलेला आहे, असा कोठेही आरोप केलेला नाही. संपूर्ण फिर्याद पाहिली असता त्यामध्ये आरोपी कर्मचारी व चेअरमन, व्हाईस चेअरमन जबाबदार आहेत, असे नमूद केलेले आहे.

८. शितकरण केंद्रात दुध स्विकारणे व त्याचे वितरण करण्याची जबाबदारी ही केंद्रप्रमुख व तेथील कर्मचारी यांची आहे. तेथील सर्व व्यवहार कार्यकारी संचालक, केंद्रप्रमुख व कर्मचारी यांचे नियंत्रणाखाली चालतो, त्यामुळे आरोपी / अर्जदार हे त्यास जबाबदार नाहीत. सदरचे सन २००५ चे नफा - तोटा पत्रक जनरल मॅनेजर व पदाधिकारी यांनी तयार केलेले आहे, असे नमुद केलेले आहे. तसेच त्यामध्ये दुधाचा साठा दाखविलेला नाही, तसेच साठयाबाबतचा विषय संचालक मंडळासमोर मंजूरीसाठी ठेवलेला नाही अगर मंजूरी घेतलेली नाही, तसेच प्रत्येक महिन्याचे नफा तोटा पत्रकास संचालक मंडळाची मंजूरी घेतली नाही. फिर्यादीत नमुद केलेले विषय संचालक मंडळासमोर मंजूरीसाठी ठेवलेले नाहीत. संचालक मंडळाने मंजूर केलेली नाही. त्यामुळे महाराष्ट्र् सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ७३ अन्वये संचालक मंडळ जबाबदार नाही, तसेच ऑगस्ट २००६ व ऑक्टोबर २००६ ला संचालक मंडळाच्या सभा झालेल्या नाहीत तसेच शितकरण केंद्रावरील नफा - तोटा पत्रकात शितकरण केंद्रावरील साठयाचा उल्लेख नाही. संचालक मंडळासमोर विषय मंजूरीसाठी ठेवलेला नाही. त्यामुळे आरोपी / अर्जदार हे झालेल्या व्यवहारास जबाबदार नाहीत. फिर्यादीमध्ये अर्जदार / आरोपी विरूद्ध काहीही नमुद केलेले नाही.

९. फियोदीमध्ये नमुद केले आहे की, घोटाळयाच्या नुकसानीस कर्मचारी

जबाबदार आहेत, तसेच फिर्यादी यांनी केलेल्या लेखा परिक्षण काळात शासकीय प्रशासक मंडळाची नेमणूक केलेली आहे, तसेच संचालक मंडळाच्या सभा फक्त चेअरमन यांनी घेतलेल्या नाहीत. अजेंडा केलेला नाही, झालेले व्यवहार संचालक मंडळासमोर ठेवलेले नाहीत. अर्जदार / आरोपी हे फक्त संचालक आहेत म्हणून त्यांना कायदयाने जबाबदार धरता येणार नाही.

**१०.** सदरचे फिर्यादी यांनी केलेले लेखापरिक्षण हे चुकीचे पद्धतीने केलेले आहे, नियमबाहय केलेले आहे. लेखा परिक्षणामध्ये ज्या बाबी आढळल्या त्याबाबत संबंधित संचालकांचे म्हणणे घेणे, त्यांना संधी देणे आवश्यक होते, परंतू त्यांनी तसे केलेले नाही, त्यामुळे लेखा परिक्षण चुकीचे झालेले आहे. सदरचे व्यवहाराची स्वतंत्ररित्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदीअन्वये चौकशी करण्यात यावी म्हणून मा. सह निबंधक सहकारी संस्था (दुग्ध) महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्याकडे रिव्हीजन दाखल केलेले होते. त्यामध्ये झालेले लेखा परिक्षण योग्य प्रकारे झालेले नाही व सदरचे फिर्यादीत नमुद केलेले लेखापरिक्षण रिपोर्ट व सर्व वसुलीसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये काढलेली नोटीस योग्य नाही, कारण झालेले लेखा परिक्षण योग्य नाही. सदरचे लेखापरिक्षण वस्तुस्थितीस धरून झालेले नाही, त्यामुळे ते चुकीचे आहे. फक्त महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम कलम ८३ प्रमाणे चौकशीचे आदेश दिलेले आहेत. यावरून स्पष्ट होते की, लेखापरिक्षण योग्य नाही, त्यामुळे चुकीचे लेखा परिक्षण रिपोर्टवरून दाखल केलेली फिर्याद ही चुकीची आहे. तसेच मा. विभागीय निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) नाशिक यांनी पत्र फिर्यादीस दिले की, फक्त चेअरमन, व्हाईस चेअरमन व संबंधित अधिका-यावर फिर्याद दाखल करण्यासाठी नियुक्त केले, परंतू फिर्यादी यांनी दबावाखाली अर्जदार / आरोपी यांना देखील आरोपी केलेले आहे. जिल्हा सरकारी वकीलांचे मत विचारात न घेता व त्यामध्ये अर्जदार / आरोपी विरूद्ध कोणताही गैर व्यवहाराचा ठपका नसतांनाही सदरची बेकायदेशीररित्या राजकीय दबावाखाली फिर्याद दाखल केलेली आहे.

**११.** सदरचे प्रकरणात पोलीसांनी तपास करून चार्जशीट दाखल केलेले आहे. त्यामध्ये अर्जदार / आरोपी यांचे विरूद्ध कोणताही तोंडी अगर कागदोपत्री पुरावा नाही फक्त संचालक आहेत म्हणून आरोपीचे यादीत अर्जदार / आरोपीस त्रास देण्याचे हेतूने नाव घातलेले आहे. सदरचे फिर्यादीत नमुद कागदपत्रात आय.पी.सी. कलमे या प्रकरणातील फिर्यादीस लागू होत नाही. अर्जदार / आरोपी यांचा संघाचे कागदपत्रात हेराफेरी करण्याचा अगर त्यात बदल करण्याचा अधिकार नाही. सदरचे कागदपत्रे कर्मचारी व पदाधिकारी यांचे ताब्यात असतात, तसेच अर्जदार आरोपी यांनी कोणासही फसविण्याचे उद्‌देशाने कोणतेही काम केलेले नाही, तसेच कोणतेही कृत्य केलेले नाही अगर संघाचे कोणत्याही मालमत्तेत अपहार केलेला नाही. त्याबाबत चार्जशीटमध्ये कोणताही पुरावा आरोपीविरूद्ध नाही. पुढे त्यांनी कथन केले आहे की, त्यांनी जो बॉण्ड दिला आहे, तो दिवाणी स्वरूपाचा आहे. फिर्यादीने त्या बॉण्डचा चुकीचा अर्थ लावून या आरोपींना त्यात गोवले आहे. तरी त्यांना या खटल्यातून वगळावे.

**१२.** आरोपी क्र. ५ व ८ यांनी कथन केले आहे की, त्या दोघांनी मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ या न्यायालयात दाखल असलेल्या रीट पिटीशनमध्ये हजर होवून चेअरमन वगैरे कसे गैरप्रकार करतात हे निदर्शनास आणून दिले आहे व निवडणुकीची मागणी केली आहे. भा.द.वि.कलम ३४ लागू होण्यासाठी सर्वांचा समान उद्‌देश असला पाहिजे. आरोपी क्र. ५ व ८ यांचा समान उद्‌देश होता, असा पुरावा नाही. संघात जे गैरप्रकार किंवा अपहार झाले त्याच्याशी आरोपी क्र. ५ व ८ यांचा संबंध नाही, संमती नाही, त्यामुळे त्यांना या खटल्यातून वगळावे वगैरे.

**१३.** आरोपी क्र. २० याने कथन केले आहे की, या आरोपींविरूद्ध फौजदारी स्वरूपाचा गुन्हा केल्याबाबत सकृतदर्शनी पुरावा चार्जशिटमध्ये दिसून येत नाही, तो एक तरूण असून नवीनच तात्पुरती नोकरी लागली याचा गैरफायदा घेवून खोटया नाटया तक्रारी व रेकॉर्ड त्याच्याविरूद्ध तयार केलेले आहे. ते सर्व एकतर्फी अशा स्वरूपाचे आहे, त्याच्याकडे कोणतीही एन्ट्रस्टमेंट नाही. त्याच्याविरूद्ध दाखल केलेले चार्जशिट तथ्यहीन

आहे, त्यामुळे त्याला या केसमधून वगळावे.

**१४.** सरकारी वकीलांनी नि. १७४, २३२, १७९अ या निशाण्यावर यासर्व अर्जाचे म्हणणे दाखल केलेले आहे. या सर्व म्हणण्याचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

**१५.** फिर्यादीने लेखापरिक्षण करून फिर्याद दाखल केलेली आहे. फिर्याद हाच पुरावा सर्व आरोपींविरूद्ध दोषारोप निश्चित करण्यास पुरेसा आहे. फिर्यादीमध्ये किंवा प्रथम खबरी अहवालामध्ये प्रत्येक आरोपीने काय रोल केला हे नमूद आहे. तपासी अंमलदाराने ५१ साक्षीदार तपासलेले आहेत. तसेच नगर तालुका सहकारी दुध संघाचे रेकॉर्ड जप्त करून त्यानंतर दोषारोपपत्र पाठवले आहे. आरोपींविरूद्ध सढळ असा कागदोपत्री पुरावा आहे. **राजेंद्र विरूद्ध स्टेट ऑफ महाराष्ट्र** (२०११ ऑल एम आर ३६५२) नुसार डिसचार्ज अर्ज निर्णित करतांना आरोपीचा बचाव विचारात घेता येत नाही. **सुरेंद्र भोरे वि. जगजितसिंग चिरागिया** (२००६ ऑल एम आर (क्रिमीनल)३१५४) या न्यायनिर्णयात सरकार पक्षाने दाखल केलेले मटेरियल आहे असे खरे समजून अर्ज निर्णित करावा, असे निर्णित झाले आहे. ए आय आर १९९७ एस सी २०४१ मध्ये हा अर्ज निर्णित करतांना को-याब्रेशन असणे गरजेचे नाही असे निर्णित झालेले आहे. यासर्व न्यायनिर्णयांचा विचार करावा व आरोपींचे अर्ज फेटाळावेत.

**१६.** आरोपी क्र. २० तर्फे अॅड. श्री. आठरे यांनी युक्तीवाद केला की, आरोपी क्र. २० हा एक तरूण असून तात्पुरत्या नोकरीला लागला आहे, त्याचा गैरफायदा घेवून खोटया नाटया तक्रारी व रेकॉर्ड त्याच्या विरूद्ध तयार केले आहे, ते सर्व एकतर्फी आहे. नवीन नोकरीला लागलेला माणूस अपहार करू शकत नाही. त्याच्याकडे कोणतीही एन्ट्रेस्टमेंट नव्हती, त्यांनी **कांतीलाल शहा वि. स्टेट ऑफ गुजरात** (ए आय आर १९७४ सुप्रीम कोर्ट २२२) हा न्यायनिर्णय दाखल केला व युक्तीवाद केला की, नवीन नोकरीला लागलेला माणूस काही कळायच्या आधी अपहार करील असे म्हणता येत नाही. त्यामुळे त्यास या केसमधून वगळावे. त्यांनी असाही युक्तीवाद केला की, हा

आरोपी व इतर आरोपी पब्लिक सर्वन्ट नसल्याने भा.द.वि. कलम ४०९ लागत नाही.

**१७.** ॲड. श्री. शेळके, ॲड. श्री. ताके, ॲड. श्री. मोरे, ॲड. श्री. वाय.बी. पाटील यांचा युक्तीवाद एकसारखाच आहे. त्यांनी त्यांच्या अर्जातील कथने सांगून युक्तीवाद केला की, आरोपी संचालक असल्याने रोजच्या कामामध्ये त्यांचा सहभाग नव्हता, फिर्यादीमध्ये त्यांनी एखादी कृती केली असे कोठेही नाही. केवळ दिवाणी जबाबदारी करून दिलेल्या बॉण्डने येते, म्हणून त्यांना आरोपी केलेले आहे. त्यांनी पुढे युक्तीवाद केला की, चेअरमन व कामगार यांनी ज्या चुका केल्या, त्याची शिक्षा संचालकांना देता येणार नाही. ज्या ज्या अपहाराच्या बाबी लिहिल्या आहेत, त्यात संचालकांचा प्रत्यक्ष संबंध नाही. त्यांनी पुढे युक्तीवाद केला की, मासिक सभा घेतल्या नाहीत व त्यात मंजूरी घेतली नाही, त्यामुळे संचालक जबाबदार नाहीत. त्यांनी पुढे असाही युक्तीवाद केला की, सरकारी वकीलांनी जे मत दिले आहे, त्यानुसार संचालक आरोपी ठरत नाहीत. महाराष्ट्र सहकारी संस्था कलम १९६० चे कलम ७३ नुसार संचालक मंडळाची मंजूरी घेतली नसेल तर त्यास संचालक जबाबदार राहत नाही, त्यामुळे सर्व संचालक आरोपींविरूद्ध कोणताही पुरावा नाही. त्यांनी **विकास भोसले वि. स्टेट ऑफ महाराष्ट्र** (क्रिमिनल रीट पिटीशन नं. ११४४/२०१२), **स्टेट ऑफ महाराष्ट्र वि. सोमनाथ थापा** (ए आय आर १९९६ सुप्रीम कोर्ट १७४४ (१)) हे न्यायनिर्णय दाखल केले व युक्तीवाद केला की, आरोपीचा प्रत्यक्ष सहभाग नसेल तर त्यास डिसचार्ज करावे. त्यांनी विकास भोसले या न्यायनिर्णयानुसार कथन केले की, आरोपीला पैसे मिळाले हे सिद्ध होत नसेल तर अपहाराचे कलम त्याच्याविरोधात लावता येत नाही. त्यांनी युक्तीवाद केला की, या दोन न्यायनिर्णयाचा विचार करून संचालक आरोपींचे अर्ज मंजूर करावेत.

**१८.** ॲड. श्री. साठे यांनी युक्तीवाद केला की, आरोपी क्र. ५ वगैरे यांनी मा. उच्च न्यायालयात रीट पिटीशन दाखल केले व त्यामध्ये संचालक मंडळाच्या कारभारास व मुदतवाढीस विरोध केला. संचालक मंडळाने घातलेले घोळ मा. उच्च न्यायालयाच्या

निदर्शनास आणून दिले. त्यांनी गैरप्रकार मांडले, त्यांनी संचालक मंडळाने ॲडमिस्ट्रेटर यांनी चार्ज घेतला नाही, अशी खोटी माहिती देवून कार्यभार सोडला नाही व मुदत वाढवून घेतली वगैरे कथन केले. त्यांनी इतर संचालक आरोपी सारखाच पुढे युक्तीवाद केला.

**१९.** सरकारी वकीलांनी युक्तीवाद केला की, फिर्यादीने लेखापरिक्षण करून फिर्याद दाखल केलेली आहे. फिर्याद हाच पुरावा सर्व आरोपीविरूद्ध दोषारोप निश्चित करण्यास पुरेसा आहे. फिर्यादीमध्ये किंवा प्रथम खबरी अहवालामध्ये प्रत्येक आरोपीने काय रोल केला हे नमूद आहे. तपासी अंमलदाराने ५१ साक्षीदार तपासलेले आहेत. तसेच नगर तालुका सहकारी दुध संघाचे रेकॉर्ड जप्त करून त्यानंतर दोषारोपपत्र पाठवले आहे. आरोपीविरूद्ध सढळ असा कागदोपत्री पुरावा आहे. राजेंद्र विरूद्ध स्टेट ऑफ महाराष्ट्र (२०११ ऑल एम आर ३६५२) नुसार डिसचार्ज अर्ज निर्णित करतांना आरोपीचा बचाव विचारात घेता येत नाही. सुरेंद्र भोरे वि. जगजितसिंग चिरागिया (२००६ ऑल एम आर (क्रिमीनल)३१५४) या न्यायनिर्णयात सरकार पक्षाने दाखल केलेले मटेरियल आहे असे खरे समजून अर्ज निर्णित करावा असे निर्णित झाले आहे. ए आय आर १९९७ एस सी २०४१ मध्ये हा अर्ज निर्णित करतांना को-याब्रेशन असणे गरजेचे नाही असे निर्णित झालेले आहे. यासर्व न्यायनिर्णयांचा विचार करावा व आरोपींचे अर्ज फेटाळावे, वगैरे.

**२०.** सर्व अर्ज, सर्व आरोपींचे वकील व सरकारी वकील यांचा युक्तीवाद लक्षात घेता तसेच फिर्याद व दाखल कागदपत्रे वाचली असता असे दिसून येते की, आरोपी क्र. २० याने कसा अपहार केला व कसे खोटे रेकॉर्ड तयार केले याबाबत फिर्याद क्र. १२, १५ मध्ये सविस्तर नमूद आहे. त्याने खोटे रेकॉर्ड तयार केले असे फिर्यादीत नमूद आहे. त्याचप्रमाणे त्यांनी दूध वाहतूक न होता वाहतूक संस्थेला भाडे दिले, असे कथन आहे. त्यांनी केलेल्या कृत्याबाबत फिर्यादीमध्ये सविस्तर कथन असल्याने त्यांच्याविरोधात पुरावा नाही असे म्हणता येत नाही. तो नवीन नोकरीला लागला, असे दाखवणारे

काहीही दाखल नाही, त्याने दोन वर्षापेक्षा जास्त काळ नोकरी केली आहे, असे दिसून येते. त्यामुळे अपहार करू शकत नाही, असे नाही. आरोपीच्या वकीलांनी दाखल केलेला न्यायनिर्णय त्यामुळे लागू होत नाही. त्यामुळे त्याच्याविरूद्ध दाखल असलेले दोषारोप योग्य आहेत, त्यामुळे त्यास डिसचार्ज करता येत नाही.

**२१.** जे संचालक आरोपी आहेत, त्यांनी संगनमत करून अपहार केला असे फिर्यादीत स्पष्ट नमूद आहे, तसेच फिर्याद कलम ९ मध्ये संचालक मंडळाने नफा तोफा अहवालास मंजूरी देणे त्याबाबत विचारणा करणे गरजेचे असतांना तसे केले नाही, असे कथन आले आहे. मासिक सभा घेतल्या नाहीत, असेही कथन आलेले आहे. संचालक मंडळाने काही विषय मासिक सभेतून वगळण्यास परवानगी दिली, असे कथन आहे. सर्व फिर्याद एकत्रात वाचली असता असे दिसून येते की, प्रत्येक संचालकाने त्यांची जबाबदारी पार न पाडून जो अपहार झाला, त्यास मुकसंमती दिली व ज्या बाबी करणे गरजेचे होते, त्या केल्या नाहीत. काही संचालकांनी प्रवासखर्च म्हणून रक्कम उचलली, परंतू प्रत्यक्ष प्रवासाबाबत बीले किंवा पुरावा सादर केला नाही व सदर रकमेचा अपहार केला असे फिर्यादीत स्पष्ट लिहिले आहे. संचालक मंडळाने एका संलग्न संस्थेला परस्पर भारतीय सैन्य दलाला दूध पुरवठा करण्यास मुकपरवानगी दिली, असाही आरोप केलेला आहे. फौजदारी गुन्हा हा कृतीनेच (ॲक्ट) होतो असे नाही, काही ओमिशनने सुद्धा होतो, संचालक आरोपींनी ओमिशन्स करून या गुन्हयात सहभाग घेतला असे संपूर्ण फिर्याद वाचली असता दिसून येते. त्यांनी जगदंबा संस्थेच्या हिताचा निर्णय घेतल्याने दुध संघाचा तोटा झाला असेही फिर्यादीत कथन केलेले आहे. आर्थिक गुन्हयात संगनमताचा पुरावा हा प्रत्यक्ष असू शकतो, तसेच अप्रत्यक्षही असू शकतो. या केसमध्ये संचालक आरोपींनी संगनमत केले व चेअरमन व अधिकारी, कामगार यांना संरक्षण दिले असा आरोप आहे, त्यामुळे त्याबाबत पुरावा घेतल्यावरच अंतिम निर्णय घेता येईल. संचालक मंडळाने सहकार खात्याची परवानगी न घेता काही ठेवी ठेवल्या व त्यातून अपहार केला, असे फिर्यादीमध्ये नमूद केलेले आहे. त्यामुळे सर्व संचालक आरोपी डिसचार्ज करण्यास पात्र नाहीत, असे दिसून येते. या न्यायालयात या

आरोपींविरूद्ध सविस्तर चौकशी करून साक्षीदार तपासून दोषारोपपत्र दाखल केलेले आहे, त्याकरीता खाडाखोड झालेले रेकॉर्ड जप्त करण्यात आलेले आहे. सरकारी वकीलांनी दिलेले मत म्हणजे पुरावा नाही, त्यामुळे त्याचा फायदा आरोपींना होत नाही. फिर्यादीमध्ये काही ठिकाणी कोणत्या आरोपीचा काय रोल आहे हे नमूद केले आहे व काही ठिकाणी संगनमत कसे आहे हे नमूद केले आहे. या संचालक आरोपींचा रोल त्यांनी केलेल्या ओमिशनवरून दिसून येतो. तसेच त्यांनी केलेल्या ठरावावरुन काही संस्थाना प्रत्यक्ष फायदा झाला व दुध संघाचा तोटा झाला हे दिसून येते व त्यातून त्यांचे संगनमत दिसून येते.

**२२.** आरोपी क्र. ५ वगैरे यांनी जरी मा. उच्च न्यायालयात हजर होवून काही बाबी मा. उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्या असल्यातरी त्यांचे संगनमत नाही असे म्हणता येत नाही. संचालक मंडळाने जे निर्णय घेतले, ज्या ओमिशन्स केल्या त्यामध्ये तेही होते. संचालक मंडळाने अनेक बाबींना मुकसंमती दिली व त्याद्वारे संगनमत केले, त्यामध्ये मा. उच्च न्यायालयात रीट दाखल करणारे संचालक सुद्धा होते. त्यामुळे तेही इतर संचालकाइतकेच दोषी असल्याचे दिसते. संचालक मंडळाच्या मुकसंमतीने खोटया नोंदी करून परस्पर दुधाची विल्हेवाट लावली असा आरोप आहे, त्याचप्रमाणे करारनामा न करता काही संस्थांना दुध दिले असेही दिसून येते. तसेच रिचिलिंग करतांना तोटा केला, हेही दिसून येते. संचालक तोडमल, पालवे, शेळके, मगर, भाबड, जगताप, लाडगे यांनी तर वाहतूक खर्चास रक्कम उचलून त्याचा हिशोब दिला नाही, असे दिसून येते.

**२३.** आलेला संपूर्ण पुरावा पाहता संचालक मंडळाचे संगनमत दिसते, तपासी अंमलदाराने एकुण ५१ साक्षीदार तपासले आहेत, तसेच रेकॉर्ड जप्त केलेले आहे, त्यामुळे या आरोपींविरूद्ध पुरावा नाही असे म्हणता येत नाही किंवा आलेला पुरावा आहे तसा स्विकृत केला तरी आरोपींविरूद्ध गुन्हा सिद्ध होत नाही, असे म्हणता येत नाही. आरोपींनी दाखल केलेल्या न्यायनिर्णयातील बाबी (फॅक्टस्) व या खटल्यातील बाबी

वेगवेगळया आहेत. त्यामुळे आरोपींनी दाखल केलेले न्यायनिर्णय या खटल्यास लागू होत नाहीत. दाखल असलेल्या पुराव्यात आरोपी क्र. २० वगळता इतर आरोपींचे संगनमत आहे, असे दिसून येते, परंतू आरोपी क्र. २० चा प्रत्यक्ष सहभाग असल्याचे दिसून येते. आरोपी पब्लीक सर्वन्ट नसल्याने भा.द.वि. कलम ४०९ लागू होत नाही, परंतू इतर कलमे लागू होतात. महाराष्ट्र सहकार कायदयाखाली नव्याने चौकशी प्रस्तावित झाली म्हणून लेखापरिक्षण अहवाल चुकीचा आहे, असे म्हणता येत नाही. संघाचे काही रेकॉर्डमध्ये खाडाखोड झाले असेही कथन आहे. आरोपींचे संगनमत दिसून येत असल्याने महाराष्ट्र सहकार कायदा कलम ७३ चा फायदा डिसचार्जकामी आरोपींना होत नाही. आरोपींनी मासिक सभा झाल्या नाहीत म्हणून कोठेही तक्रार केली नाही व त्याद्वारे सुद्धा मुकसंमतीने अपहारात संगनमत केले असे दिसून येते. त्यामुळे सर्व आरोपींचे अर्ज फेटाळले तर न्यायोचित होईल असे वाटते, सबब आदेश

## <u>आदेश</u>

१. सर्व आरोपींचे नि. क्र. १६२, १७९, १८२, १८६, १८७, १८८, १८९, १९०, १९१, १९२, १९३, २६६ वरील सर्व अर्ज फेटाळण्यात येतात.

२. खुल्या न्यायालयात आदेश निवेदित करून आदेश टंकलिखित करून आदेश घोषित करण्यात आला.

३. हा संयुक्त आदेश नि. १६२ बरोबर ठेवावा.

(श्रीपाद श. देशपांडे)
५ वे सहदिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर व
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी
अहमदनगर.

दिनांक :- १९/०९/२०१७.